उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई.

विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावयाचा तपशिल

विषय : शासकीय सेवानिवृत्त अधिका-यांच्या सेवा विवक्षित कामासाठी करार पद्धतीने उपलब्ध करून घेणेबाबत.

विभागाची आवश्यकता :

उद्योग विभागाच्या दि.०१.१२.२०१६ रोजीच्या खरेदी धोरणामध्ये सुधारणा करणे तसेच उद्योग विभागातील विविध धोरणांचे प्रारूप, मोडॅलिटी तयार करणेकरिता उद्योग संचालनालयातील गट-अ (वेतनस्तर एस- २७ किंवा अधिक) संवर्गीय सेवेमधून १ तज्ञ व अनुभवी सेवानिवृत्त अधिकारी यांची उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई येथे आवश्यकतेनुसार करार पद्धतीने नियुक्ती करावयाची आहे.

| अ.क्र. | पदाचा तपशिल | पदसंख्या | कामाचे स्वरूप |
|---|---|---|---|
| १. | उद्योग संचालनालयातील गट-अ संवर्गातील अधिकारी (वेतनस्तर एस- २७ किंवा अधिक) | १ | उद्योग विभागाच्या दि.०१.१२.२०१६ रोजीच्या खरेदी धोरणामध्ये सुधारणा करणे तसेच उद्योग विभागातील विविध धोरणांचे प्रारूप, मोडॅलिटी तयार करणे. |

अटी व शर्ती :

(१) सदर नियुक्ती प्रथमत: एक वर्षासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दिनांक १० जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात येणार आहे.

(२) उमेदवार उद्योग संचालनालयातील गट-अ (वेतनस्तर एस- २७ किंवा अधिक) या पदावरून सेवानिवृत्त झालेला असावा.

(३) उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे.

(४) उमेदवाराचे वय ६५ वर्षांपेक्षा अधिक नसावे.

(५) उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्ह्यात राहणारा असावा.

(६) आवश्यक अर्हता धारणा करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

(७) उमेदवाराने सदर पदाकरिता विभागाच्या संकेतस्थळावरील जाहिरात पाहून जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून **दि.१६.०३.२०२६ रोजी सायंकाळी ५.३० वा. पर्यंत** उद्योग-४ कार्यासन, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, दालन क्रमांक १२८, विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ या कार्यालयात आपला अर्ज टंकलिखित स्वरूपात सर्व कागदपत्रांच्या पूर्ततेसह विहीत नमुन्यात अर्ज करावा.

(८) या संदर्भात अधिक माहितीसाठी **०२२-२२०४ ४२१२** या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

(९) विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

(१०) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा राहील.

(११) करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिकाऱ्यास **उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई** येथे काम करावे लागेल.

(१२) करार पध्दतीच्या नियुक्तीवरील कालावधीत सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी हे संबंधित सह सचिव / उप सचिव यांच्या नियंत्रणाखाली काम करतील.

(१३) इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दिनांक १० जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

## अर्जाचा नमुना

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई येथे राज्य शासनाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची सेवा उपलब्ध करून घेणेकरिता करार पध्दतीने विवक्षित कामासाठी नियुक्तीकरिता अर्ज.

१. अर्जदाराचे संपूर्ण नाव :-

२. अर्जदाराचा संपूर्ण पत्ता :-

३. सेवानिवृत्तीच्या वेळेचे पदनाम व वेतनस्तर:-

४. भ्रमणध्वनी क्रमांक:-

५. जन्म दिनांक व वय :-

६. शैक्षणिक अर्हता :-

७. अनुभव :-

उपरोक्त पदावर करार पध्दतीने नियुक्तीची जाहिरात/सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण:-

दिनांक:-

उमेदवाराचे नाव व स्वाक्षरी